# नवी मुंबई पोलीस आयुक्तालय

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# कृतज्ञता पत्र

मा.श्री. गुडविल इंडिया पुणे

नवी मुंबई पोलीसांनी गडचिरोली जिल्हयातील अतिदुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी बांधवांना वाटप करण्यासाठी आपल्याकडील जुने किंवा नवीन कपडे, संसारोपयोगी भांडी व खेळाचे साहित्य आणून देण्याचे आवाहन केले होते.

आपण या आवाहनास तात्काळ प्रतिसाद देऊन आपल्याकडील तसेच आपले सोसायटीतील नागरिकांकडून कपडे, संसारोपयोगी भांडी, क्रिकेट व व्हॉलीबॉल या खेळांचे साहित्य उत्स्फूर्तपणे आम्हांला उपलब्ध करुन दिले.

आपला या उपक्रमातील सहभाग आपली सामाजिक बांधिलकी दर्शवणारा तर आहेच पण त्यातून आपली सामाजिक सहकार्याची भावना व उत्तरदायित्व दिसून येते.

हे सर्व कपडे व साहित्य गडचिरोली पोलीसांमार्फत तेथील आदिवासी बांधवांना वाटप करण्यात येणार आहे. आपली ही मदत व सहकार्य त्यांच्या जीवनात नक्कीच आनंद निर्माण करील, अशी खात्री आहे.

आपल्या या उपक्रमातील सहभागाबद्दल नवी मुंबई पोलीस दलातर्फे मी आपले मन:पूर्वक अभिनंदन करतो व कृतज्ञता ही व्यक्त करतो.

**पोलीस आयुक्त**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय